ePaper

## पावसाचे थैमान!; मुंबई, ठाण्याला ऑरेंज, तर रायगड, रत्नागिरी, कोल्हापूरला रेड अलर्ट जारी



| वर्ष - 6 । अंक - 91 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- गंधर्व नाटक मंडळीच्या सुवर्णस्मृतींना 'सावतामाळी भवन'मध्ये उजाळा
- आरोग्य सेवेला 'बुस्टर डोस'!
- खुशखबर! इंधन स्वस्ताई लवकरच!!

www.mahaenews.com | ।बुधवार । दिनांक 6 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



दुसऱ्या पक्षाला श्रेय मिळू नये यासाठी शिवसेनेने औरंगाबादचं नामांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. 'संभाजीनगर' नामकरणाविरोधात आम्ही सर्व जाती-धर्मीय शहरवासीयांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरू. 'हा निर्णय संभाजी महाराज यांच्या प्रेमापोटी घेतला नसून सत्ता जात असल्याचं पाहून उद्धव ठाकरे यांनी हा निर्णय घेतला. तर येत्या काळात या निर्णयाविरोधात सर्व जाती धर्मातील लोकांना विश्वासात घेऊन रस्त्यावरची व न्यायालयीन लढाई लढणार आहे.

-इम्तयाज जलील, एमआयएमचे खासदार

गद्दारांच्या डोळ्यात विकृत हसू आणि निष्ठावंतांच्या डोळ्यात अश्रू आहेत. या सर्वांमधून मी मार्ग काढणार आहे. २५ ते ३० वर्ष आपल्या सोबत राहिले ते कट्टर शत्रू झाले आहेत. २५-३० वर्ष ज्यांच्यासोबत लढलो (काँग्रेस राष्ट्रवादी), जेव्हा सरकार स्थापन करण्याची वेळ आली का सरकार स्थापन केलं हे देखील माहित आहे, सातत्याने सांगितलं जायचं काँग्रेस पाहा काय करेल, राष्ट्रवादीच्या शरद पवारांच्या कपाळावर तर शिक्काच आहे, पण ते सोबत राहिले.

- उद्धव ठाकरे, शिवसेना



### आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीनंतर प्रशासनाचा निर्णय

# दिघीतील माजी सैनिक भवनला अखेर मंजुरी!

### माजी सभापती चेतन घुले यांचा यशस्वी पाठपुरावा

**।पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि माजी सैनिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद कर्नल संतोष महाडीक भवन या बहुउद्देशीय इमारतीमध्ये विविध कल्याणकारी उपक्रम राबविण्यासाठी प्रशासक राजेश पाटील यांनी मान्यता दिली. गेल्या अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेली मागणी अखेर मार्गी लागली आहे. त्यामुळे दिघी आणि परिसरातील माजी सैनिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. भाजपा शहराध्यक्ष महेश लांडगे आणि शिक्षण समितीचे माजी सभापती चेतन घुले यांनी याबाबत पुढाकार घेतला. काही दिवसांपूर्वी आयुक्त राजेश पाटील आणि संबंधित



विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली होती. त्याला यश मिळाले आहे. स्थायी समिती आणि महापालिका सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना तसेच त्यासाठी येणाऱ्या सुमारे ४१ कोटी ९० लाख इतक्या खर्चास आजच्या बैठकीत प्रशासक राजेश पाटील यांनी मंजुरी दिली. महापालिका मुख्य प्रशासकीय भवनामध्ये झालेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप यांच्यासह विषयाशी संबंधित अधिकारी आणि विभागप्रमुख उपस्थित होते.

माजी सैनिक भवनच्या बहुउद्देशीय इमारतीमध्य सेवानिवृत्त सैनिकांसाठी व त्याच्या सैनिकांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी स्कील डेव्हलपमेंट सेंटर, विद्यार्थ्यांसाठी सेना दलातील व इतर स्पर्धा परीक्षासाठी मार्गदर्शन केंद्र, सेवा निवृत्त सैनिकांसाठी मोबाईल आरोग्य केंद्र, माजी सैनिकांच्या महिलांसाठी आणि विधवा महिलांसाठी लघुउद्योग मार्गदर्शन केंद्र, संरक्षणाशी संबंधित सर्व पुस्तकांचे ग्रंथालय व वाचनालय, माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांसाठी वधू वर सूचक केंद्र, सेवानिवृत्तीनंतर नोकरी विषयी माहिती व मार्गदर्शन केंद्र, माजी सैनिकांच्या परिवारासाठी समुपदेशन केंद्र, त्यांच्या पेन्शन विषयी समस्या व त्यावरील उपाय, समुपदेशन केंद्र, माजी सैनिकांना राज्य कल्याण विभागाकडून उपलब्ध सवलती देण्याचे कार्य करणे असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

युवकांना मोफत कौशल्य प्रशिक्षण...

महापालिका क्षेत्रातील १८ ते ३५ वयोगटातील युवक युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, विविध कौशल्य असलेले मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी त्यांना नामांकित संस्थांमार्फत मोफत कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे, यासाठी प्रशासक राजेश पाटील यांनी मान्यता दिली. सिम्बॉयसीस स्कील अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी यांच्या सिम्बॉयसीस ओपन स्कील एज्युकेशन सोसायटी, टेक महिंद्र स्मार्ट अकॅडमी, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड, टाटा स्ट्राइव्ह, इंडो जर्मन टूल रूम या प्रशिक्षण संस्थेमार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

#### ताथवडे येथील मैलाशुद्धीकरण प्रकल्पाला मान्यता...

मालमत्ता कर ऑनलाईन भरणाऱ्या मालमत्ताधारकास सामान्य करात सवलत देण्यास प्रशासक पाटील यांनी मान्यता दिली आहे. जुलै ते सप्टेंबर २०२२ अखेर दरम्यान सामान्य कर ऑनलाईन भरल्यास ४ टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच ताथवडे येथील मैलाशुद्धीकरण प्रकल्प बांधण्याच्या कामास मान्यता देण्यात आली आहे. नागरिकांच्या सोयीसाठी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्वाचा आहे. आंतरराष्ट्रीय कनिष्ठ हॉकी स्पर्धा २०२२ च्या आयोजनासाठी महापालिका सभेची मंजुरी आवश्यक होती, या विषयास प्रशासक राजेश पाटील यांनी मान्यता दिली आहे.

### चिखली येथील घरकूल योजनेची संगणकीय सोडत

# घरकुल लाभार्थ्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार !

### आयुक्त राजेश पाटील यांचे प्रतिपादन

**।पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज**

घरकुल योजनेत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना महापालिकेच्या वतीने चांगले घर उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असून स्वत:च्या हक्काच्या घराचे स्वप्न प्रत्यक्ष साकार होणे हा आनंदाचा क्षण आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी केले. प्राधिकरण सेक्टर क्रमांक १७ आणि १९ चिखली येथे राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेतील इमारतीतील सदनिकांची संगणकीय सोडत चिंचवड येथील झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन कार्यालयामध्ये आयुक्त पाटील यांच्या हस्ते पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, प्रशासन अधिकारी श्रीकांत कोळप, कार्यकारी



अभियंता शिरीष पोरेडी, महापालिका कर्मचारी यांच्यासह सदनिका लाभार्थी उपस्थित होते.

आयुक्त पाटील म्हणाले, शासन निर्णयानुसार पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाची घरे उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी महानगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करीत राहील. पात्र ठरलेल्या सर्व लाभार्थ्यांना पुढील काळात चांगले घर उपलब्ध करुन देण्यासाठी सदनिका दिल्या जातील. या सदनिकांमध्ये महापालिकेने सर्व सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला आहे. सदनिकांच्या सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना मुलभूत सुविधांसह घरे उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील राहील.

## शॉर्ट न्यूज »

### थेऊरमध्ये तरुणीचा दगडाने ठेचून खून




। पुणे। महाईन्यूज ।

थेऊरमधील यशवंत सहकारी साखर काराखान्याच्या मोकळ्या जागेत एका तरुणीचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खून झालेल्या तरुणीची ओळख पटलेली नाही. यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या मोकळ्या जागेत एका तरुणीचा मृतदेह दिसल्याची माहिती नागरिकांनी लोणी काळभोर पोलिसांना दिली. त्यानंतर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष काळे आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. तरुणीच्या डोक्यात दगड मारुन खून करण्यात आल्याचे उघडकीस आले. तरुणीच्या चेहऱ्यावर दगड मारण्यात आल्याने तिची ओळख पटू शकलेली नाही. तरुणीच्या खुनामागचे कारण समजू शकले नसून पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.शिंदे, गणपत थिकोळे, किरण घुटे, तुषार खराडे, अमजद शेख आदींनी ही कारवाई केली.

# गंधर्व नाटक मंडळीच्या सुवर्णस्मृतींना 'सावतामाळी भवन'मध्ये उजाळा!

## 'गंधर्व नाटक मंडळी'चा शतकोत्तर दशकपूर्ती समारंभ



पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

संगीत रंगभूमीच्या सुवर्णस्मृतींना 'सावतामाळी भवन'मध्ये मंगळवारी नव्याने उजाळा देण्यात आला. संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ अजरामर करणारे नटसम्राट बालगंधर्व, संगीतकार गोविंदराव टेंबे आणि नटश्रेष्ठ गणपतराव बोडस यांच्या उपस्थितीत स्थापन झालेल्या 'गंधर्व नाटक मंडळी'चा शतकोत्तर दशकपूर्ती समारंभ त्यांच्या वंशजांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करून साजरा झाला.

गंधर्व नाटक मंडळी'च्या ११० व्या स्थापनादिनानिमित्त बालगंधर्व संगीत रसिक मंडळाच्या वतीने बालगंधर्व यांच्या नातसून अनुराधा राजहंस, गोविंदराव टेंबे यांचे नातू दीपक टेंबे आणि गणपतराव बोडस यांचे पणतू व प्रसिद्ध ऑर्गनवादक राहुल गोळे यांचा मंडळाचे अध्यक्ष सुरेश साखवळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नाट्यसंगीत गायक रवींद्र कुलकर्णी, मंडळाचे कोषाध्यक्ष नारायण भालेराव, सचिव अवंती बायस, विवेक काटकर आणि संतोष रासकर या वेळी उपस्थित होते. बालगंधर्व यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच त्यांच्या गाजलेल्या नाटकांमधील संवादांचे सादरीकरण झाले. साखवळकर म्हणाले, मतभेदांमुळे किर्लोस्कर नाटक मंडळीमधून बाहेर पडून बालगंधर्व, गोविंदराव टेंबे आणि गणपतराव बोडस यांनी ५ जुलै १९१३ रोजी गुरुपुष्यामृताच्या मुहूर्तावर बुधवार पेठेतील माळ्यांची धर्मशाळा म्हणजेच सध्याचे सावतामाळी भवन येथे 'गंधर्व नाटक मंडळी'ची स्थापना केली. या नाटक कंपनीला काकासाहेब खाडिलकर यांनी 'गंधर्व नाटक मंडळी' हे नाव दिले. साहित्यसम्राट न. चिं. केळकर, सॉलिसिटर पी. एम. लाड, पेण येथील बाबासाहेब धारकर, मुंबई येथील डी. एल. वैद्य असे दिग्गज या वेळी उपस्थित होते. संगीत रंगभूमीवरील या ऐतिहासिक घटनेला उजाळा देण्यात आला ही आनंदाची बाब आहे.

# पुणे शहरासह जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर प्लास्टिक बंदी

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



पुणे शहरासह जिल्ह्यात १ जुलैपासून प्लास्टिक बंदी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार पर्यटनस्थळांवर देखील १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या वस्तू, पिशव्यांना बंदी करण्याचा निर्णय महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन – एमटीडीसी) घेतला आहे. त्यानुसार पर्यटन स्थळावर असणारे खाद्यविक्रेते, छोटे-मोठे उपाहारगृहचालक, महामंडळाची निवासस्थाने या ठिकाणी पर्यटकांना प्लास्टिक वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या आदेशानुसार पर्यटन आणि पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रामुख्याने स्थानिक पातळीवरील नागरिकांना प्लास्टिक बंदीबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे या निर्णयाचे काटेकोर पालन करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार असून नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

याबाबत महामंडळाच्या पुणे विभागाचे प्रादेशिक व्यवस्थापक दीपक हरणे म्हणाले, 'अष्टविनायकासह, गडकोट किल्ले, धार्मिक स्थळे, नागमोडी वळणे असलेले घाट, उंच डोंगररांगामधून वाहणारे धबधबे आणि इतर निसर्गरम्य ठिकाणे पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. याशिवाय महामंडळाच्या पुणे विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या ठिकाणी पावसाळ्यात उंचावरून कोसळणारे धबधब्यांचे माळशेज घाटासारखे ठिकाणांवर पर्यटकांची भूरळ असल्याने पर्यटकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. भटकंती किंवा पर्यटनासाठी येताना पर्यटकांकडे प्लास्टिकच्या बाटल्या, प्लास्टिकचे ग्लास, कॅरीबॅग, पत्रावळ अशा अनेक वस्तू आणल्या जातात. तसेच स्थानिक छोट्या मोठ्या व्यावसायिकांकडून विक्री देखील होत असते. परंतु, या प्लास्टिकच्या वस्तुंचा वापर झाल्यानंतर त्या आहे त्या ठिकाणीच फेकून दिल्याचे चित्र पहावयास मिळतेय स्थानिक नागरिकांकडूनही कचरा टाकण्याचे प्रकार घडतात.

# सिगारेट च्या वादावरून १५ वर्षीय मुलाचा मित्रांनी केला खून

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।




पिंपरी-चिंचवडमध्ये सिगारेट देण्यावरून झालेल्या वादात अल्पवयीन मित्राचा मित्रांनी खून केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे खून झालेला मुलगा अल्पवयीन असून मारेकरी देखील अल्पवयीन आहेत. त्यामुळं शहरात पुन्हा एकदा अल्पवयीन गुन्हेगारी डोकं वर काढत असल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. मयत अशोक (नाव बदलल आहे) तो आणि त्याचे मित्र कबुतराची ढाबळ (पिंजरा) इतर काही मुलं तोडणार असल्याने त्यांना दमबाजी करण्यासाठी एकत्रित आले होते, सोबत कोयता देखील होता. परंतु, समोरील गट न आल्याने अशोक चा आणि त्यांच्या मित्राचा सिगारेटवरून वाद झाला त्यात अशोक ला जीव गमवावा लागला आहे. पोलीस उपायुक्त मंचक इप्पर यांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक आणि त्यांच्या मित्रांकडे कबुतर, पिंजरा आहे ते इतर गटातील मुलं घेऊन जाणार असल्याची माहिती त्यांना मिळाली. तस विरोधी गटातील मुलं येणार असल्याची माहिती देखील इंस्टाग्रामवरून अशोक च्या गटाला दिली. मोशीतील टोलनाका येथे निर्जनस्थळी ते भेटायला येणार असल्याने त्यांना दमबाजी करायची या उद्देशाने सोबत कोयता घेतला.

# बेहिशेबी मालमत्ता प्रकरणात महापालिकेचे उपायुक्त विजय लांडगे यांच्यासह पत्नीवर गुन्हा

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मालमत्तेची झडती

पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।




बेहिशेबी मालमत्ता जमा केल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) पुणे महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागातील उपायुक्त विजय लांडगे यांच्यासह पत्नीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. लांडगे दाम्पत्याच्या पुणे शहरातील चार तसेच नाशिकमधील एक अशा पाच मालमत्तांची झडती घेण्याचे काम रात्री उशीरापर्यंत सुरू होते.

बेहिशेबी मालमत्ता जमा केल्या प्रकरणी आकाशचिन्ह विभागातील उपायुक्त विजय भास्कर लांडगे (वय ४९), त्यांची पत्नी शुभेच्छा (वय ४३) यांच्या विरोधात कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'एसीबी'चे पोलिस निरीक्षक भारत साळुंखे यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. लांडगे यांनी त्यांची पत्नीच्या नावे एक कोटी २ लाख ६० हजार रुपयांची बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याची तक्रार करण्यात आली होती.या तक्रारीची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. 'एसीबी'कडून करणात आलेल्या तपासात लांडगे यांनी ज्ञात उत्पन्नापेक्षा अतिरिक्त ३१ टक्के बेहिशेबी मालमत्ता पत्नीच्या नावावर खरेदी केल्याचे चौकशीत उघड झाले. पोलीस उपअधीक्षक शीतल घोगरे तपास करत आहेत. पोलीस अधीक्षक राजेश बनसोडे, अतिरिक्त अधीक्षक सूरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## शॉर्ट न्यूज

### धक्कादायक! पाच अल्पवयीन मुलांनी केला दारूच्या नशेत अल्पवयीन मुलाचा खून

पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी ।



मोशीमध्ये काल अपहरण झालेल्या 15 वर्षीय मुलाचा मृतदेह सापडल्याने सर्वत्र खळबळ उडाली. पोलीस तपासात त्याचा खून झाल्याचे समोर आले आहे. आणि धक्कादायक गोष्ट म्हणजे हा खून विधिसंघर्षित बालकांनी केल्याचे उघडकीस आले आहे. तसेच, त्याचे अपहरण झाले नसून तो स्वतः या मुलांसोबत गेल्याचे समोर आले. या प्रकरणी पोलिसांनी 3 विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले असून, पोलीस इतर दोन विधिसंघर्षित बालकांचा शोध घेत आहे. काल 15 वर्षांच्या सुमित बनसोडे याचे अपहरण झाल्याची फिर्यादी त्याची आई मिनाक्षी बनसोडे (रा. बनकरवस्ती, मोशी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली होती. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी या अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

### महापालिकेची आता 'व्हॉटस् ॲप- चॅट बॉट' प्रणाली

# आरोग्य सेवेला 'बुस्टर डोस'!

## महापालिका आयुक्त राजेश पाटील यांच्याहस्ते शुभारंभ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत नागरिकांकरीता व्हॉटस् ॲप - चॅट बॉट प्रणालीचा वापर करून नागरिकांना आरोग्य विभागाच्या सेवा सुविधा संबंधी समस्यांचे निराकरण करण्यासाठी नव्याने सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांच्या हस्ते या प्रणालीचा शुभारंभ करण्यात आला.

शहरवासीयांना आता घरबसल्या वापरता येणा-या या सुविधेकरीता महानगरपालिकेमार्फत ८८८८००६६६६ हा मोबाईल क्रमांक प्रसारित केलेला असून नागरिकांना स्वत:च्या मोबाईलमध्ये तो समाविष्ट करावा लागणार आहे.



> बृहन्मुंबई महानगरपालिकेनंतर चॅट बॉट प्रणाली सुरु करणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका राज्यातील दुसरी महापालिका ठरली आहे. नागरिक आणि प्रशासन यांच्यामधील संवाद साधण्याचा जलद दुवा म्हणून ही प्रणाली प्रभावी ठरणार आहे. सहज सुलभ संवादाचे माध्यम महापालिकेने उपलब्ध करुन दिले असून शहरातील नागरिकांनी जास्तीत जास्त चॅट बॉट प्रणालीचा वापर करावा.
>
> **- राजेश पाटील,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.

महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप, सह आयुक्त आशादेवी दुरगुडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल रॉय, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, शहर अभियंता मकरंद निकम यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

### अन्य विभागांच्या सेवाही एकाच ॲपवर...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत ८८८८००६६६६ हा मोबाईल क्रमांक आपल्या मोबाईल समाविष्ट केल्यानंतर व्हाटस् ॲपद्वारे नागरिकांना चॅट बॉट प्रणालीचा वापर करता येणार आहे. समाविष्ठ केलेल्या मोबाईल क्रमांकाद्वारे व्हाटस् ॲपद्वारे मेनु असे टाईप केल्यानंतर नागरिकांना त्यांच्या सोईनुसार भाषा निवडण्याकरीता मराठी अथवा इंग्रजी असे दोन भाषांचे पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. भाषेचा पर्याय निवडल्यानंतर आपला मोबाईल क्रमांक सत्यापित (व्हेरीफाय) करण्यासाठी आपले नांव सदर ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे. आपले नांव सत्यापित झाल्यानंतर आपणास आपली तक्रार नोंदविण्याकरीता सदर पर्याय उपलब्ध होणार आहेत.

### कोणत्या तक्रारी करता येणार..?

व्हॉटस् ॲप - चॅट बॉटप्रणालीद्वारे नागरिकांना कचरा उचलणारे वाहन आले नाही या बाबतच्या तक्रारी, महानगरपालिका संदर्भातील तक्रारी, सार्वजनिक शौचालया विषयक तक्रारी, मृत जनावरांबाबतच्या तक्रारी, परिसर रस्ता झाडलोड न झाल्याबाबतच्या तक्रारी, सांडपाणी रस्त्यावर वाहत असलेबाबतच्या तक्रारी, बांधकाम राडारोड उचलणेबाबतच्या तक्रारी, सार्वजनिक ठिकाणी कचरा पडून असणे अथवा कचरा जाळण्याबाबतच्या तक्रारी अशा प्रकारच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे नागरिकांना आपण केलेल्या तक्रारी बाबतची सद्यस्थिती देखील उपलब्ध होणार आहे.

---

### पुन्हा कमळ फुलणार : संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांचा विश्वास

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाची '१०० पार'च्या दिशेने घोडदौड !

## विश्वासदर्शक ठरावाच्या बाजुने मतदान करणाऱ्या सदस्यांचे मानले आभार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या १५ दिवसांतील वेगवान घडामोडींनंतर भाजपा-शिवसेना सरकारने विश्वासदर्शक ठराव १६४-९९ अशा फरकाने जिंकला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचे बहुमत सिद्ध झाले आहे. आता खऱ्या अर्थाने जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या पाठिंब्याने विधानसभेत सरकार स्थापन झाले. याच धर्तीवर आता आगामी पिंपरी-चिंचवड





महापालिका निवडणुकीत भाजपा १०० पार करेल, असा विश्वास भाजपा संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा- शिवसेना (शिंदे गट) सरकारने सोमवारी विधानसभा सभागृहात विश्वास दर्शक ठराव जिंकला. २०१९ मध्ये जनमत भाजपा व शिवसेना युतीला होते. मात्र, महाविकास आघाडीचा प्रयोग करुन जनमताचा अनादर करण्यात आला. आता खऱ्या अर्थाने सत्तेवर आलेले हे सरकार जनकल्याणासाठी समर्पित भावनेने काम करेल, असेही अमोल थोरात यांनी म्हटले आहे.

दरम्यान, राज्यात सत्ता परिवर्तन झाल्याबद्दल पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे आनंदोत्सव साजरा करण्यात येणार असून, शहराचे अध्यक्ष व आमदार महेश लांडगे मुंबईहून परतल्यानंतर आनंदोत्सवाचा कार्यक्रम घेण्यात येईल. भाजपाची संघटनात्मक बांधणी सक्षम असून, बूथ यंत्रणाही मजबूत करण्यात आली आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली आगामी महापालिका निवडणुकीत १०० हून अधिक जागा भाजपा निश्चितपणे जिंकणार आहे, असा दावाही अमोल थोरात यांनी केला आहे.

### चार सदस्यीय प्रभागासाठी आग्रही...

राज्यात भाजपाच्या विचारांचे सरकार आले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात झालेली महापालिका निवडणूक प्रभाग रचना राजकीय हस्तक्षेपातून तयार झाली आहे. प्रभागांची नियमबाह्यपणे तोडफोड करण्यात आली होती. तसेच, मतदार यांद्यांचाही घोळ आहे. मतदान स्थलांतरीत करण्याचा प्रकार घडला आहे. या पार्श्वभूमीवर आम्ही नव्या सरकारकडे चार सदस्यीय प्रभागपद्धतीनुसार निवडणूक घेण्याचा आग्रह करणार आहोत, असेही अमोल थोरात यांनी म्हटले आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्येही राजकीय भूकंप...

राज्यातील सत्तासमीकरणे बदलल्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील राजकीय अस्वस्थता वाढली आहे. शहरातील शिवसेनेसह राष्ट्रवादीचे अनेक माजी नगरसेवक भाजपाच्या संपर्कात आहेत. त्यामुळे आगामी काळात राजकीय भूकंप होईल. गेल्या काही दिवसांपासून भाजपातील नाराज आमच्या संपर्कात आहेत, अशा अणाभाका घेणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या पायाखालील वाळू आता सरकणार आहे, असा टोलाही अमोल थोरात यांनी लगावला आहे.

## संपादकीय »

# लाख दुखोंकी एक दवा - सेवा कर

***माध्यमांस नाट्यपूर्ण घडामोडींचा शाप असतो. त्यामुळे अशा नाट्यपूर्ण घडामोडींच्या काळात अन्य अधिक महत्त्वाच्या घटनांकडे दुर्लक्ष होते. वस्तू / सेवा कर परिषदेची गेल्या आठवड्याच्या अखेरीस झालेली ४७वी बैठक ही अशी दुर्लक्षित घटना.***

एरवी जी मुख्य बातमी ठरली असती ती राजकीय उलथापालथीमुळे आतील पानात गेली. जे झाले त्यास इलाज नाही. तथापि या बैठकीत जे झाले त्यावर आता तरी ऊहापोह व्हायला हवा. ही बैठक अधिक महत्त्वाची होती याचे कारण या कराची पंचवर्षपूर्ती. १ जुलै २०१७ साली या ऐतिहासिक कराचा अंमल सुरू झाला. गेल्या आठवड्यात १ जुलैस त्यास पाच वर्षे पूर्ण झाली. या कराचे मूळ प्रणेते, माजी वित्त सचिव विजय केळकर वस्तू/ सेवा कराचे वर्णन 'लाख दुखोंकी एक दवा' असे करायचे. तेव्हा या पाच वर्षांत या करामुळे किती दु:खे दूर झाली? मुळात हा कर म्हणजे 'दवा' आहे का? आदी प्रश्नांची चर्चा यानिमित्ताने व्हायला हवी.

हा कर अमलात येतानाच मुळातील कर प्रारूपापेक्षा नवे रूपडे घेऊन आला. या नव्या कराचे नाव जरी वस्तू/ सेवा कर असे होते तरी त्याचे दिसणे मूळ प्रारूपात जसे अपेक्षित होते तसे अजिबात नव्हते. मूळ कररचनेत कर आकारणीचे जास्तीत जास्त तीन स्तर अपेक्षित होते आणि एकाही घटकास या करातून सूट मिळता नये, असा विचार होता. प्रत्यक्षात १ जुलै २०१७ या दिवशी हा कर जन्मास आला तो कर आकारणीचे पाच-सहा टप्पे आणि पेट्रोल/ डिझेल आणि मद्य यांस करातून सवलत असे व्यंग घेऊन. तेव्हा अंगभूत व्यंग घेऊन आलेल्या या करामुळे पाच वर्षांत नक्की काय बदल झाला?

वस्तू सेवा कर परिषदेची ही ४७वी बैठक, म्हणजे प्रति वर्षी ९-१० बैठका या कराच्या 'सुसूत्रीकरण' आणि मूल्यमापनासाठी झाल्या. पहिली काही वर्षे तर या कररचनेत इतक्या सुधारणा/ बदल सुचविले गेले की या व्यंग घेऊन जन्मास आलेल्या कराच्या देहात नवी काही व्यंगे तयार झाली. म्हणजे नव्या काही घटकांस करात समाविष्ट करायचे आणि काहींना सवलती द्यायच्या, हा उद्योग अव्याहतपणे आजही सुरूच दिसतो. आताच्या ४७ व्या बैठकीत अनेक दुग्धजन्य पदार्थांवर नव्याने कर आकारणीचा निर्णय झाला. पनीर, दही, लस्सी, ताक आदी घटक आता महाग होतील. ते का? याच्या जोडीने 'नैसर्गिक' मध (अनैसर्गिक मध असतो काय?), मटण, मासे, अनेक भाज्या, बार्ली, ओट्स, बाजरीसारखी धान्ये, मका आदींना कराच्या जाळ्यात आणण्याचा निर्णय या बैठकीत झाला. एका बाजूने केंद्र सरकारी खाते गरिबांच्या अन्नात प्रथिनांचा समावेश अधिकाधिक प्रमाणात व्हावा, यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे सांगते. त्याच वेळी वस्तू/ सेवा कर परिषद प्रथिने पुरवणाऱ्या घटकांवर कर वाढवून वा त्यांना कराच्या जाळ्यात आणून हे घटक महाग करते; यास काय म्हणावे.



## आनंदी सकाळ

# सौंदर्याचा असा अपार, अनंत, आनंदपूर्ण खजिना...

गेल्या दशकापासून समाजाला अध्यात्म महत्त्वाचे वाटू लागले आहे. माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी 'माणूस' म्हणून आपले अस्तित्व अनुभवण्यासाठी अध्यात्म, नैतिकता यांची हाकाटी सुरू झाली. खरे पाहता अध्यात्म कधी उपेक्षित नसते. कधी महत्वाचे नसते. ते सर्व ठिकाणी, सर्व काळात सारख्याच महत्त्वाचे असते. ते मानव जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. अंत:करणाचा निरपेक्ष, अहंकाररहित विस्तार, समत्वबुद्धी, ईश्वराविषयीचा दृढ विश्वास, कर्मावरील अढळ श्रद्धा, स्वार्थहीन संवेदनशीलता, क्षमाभाव, मोठेपणा किंवा उदारता, पावित्र्य इत्यादींनी मिळून जी अध्यात्मवृत्ती मनाचा स्वभाव बनते, ती मुळली मानवतेने ओतप्रोत असते. म्हणून जी अध्यात्मवृत्ती मनाचा स्वभाव बनते, ती मुळी मानवतेने ओतप्रोत असते. म्हणून अशा व्यक्तींची कर्तव्यकर्मेसुद्धा लोकसंग्रहाचा भाग होतात. 'विचारुनि बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले । बरें शोधल्याविण बोलो नको हो । जनी चालणे शुद्ध नेमस्त राहो ।

# सिग्नलवरील चिमुकल्यांच्या दुर्दशेला जबाबदार कोण?



## भूमिका

**गौरव जाधव**

91 88051 21395



पुण्यामध्ये रस्त्याने गाडी चालवत असताना चहाची तलफ झाली म्हणून म्हटले एखादा चहा घ्यावा आणि मगच पुढे जावे. रस्त्याच्या कडेला असणाऱ्या एका टपरीवर चहा पिण्यासाठी थांबलो. चहाची ऑर्डर दिली आणि चहा हातात आला. चहाचा आनंद लुटणे सुरु झाले. चहा म्हणजे खरेच आमच्यासारख्या काही लोकांना ते अमृतुल्य पेय. या अमृततुल्याचे घोट घेत असताना मला समोर 3 लहान मुले लोकांच्याकडे पैसे मागताना, खाऊ मागताना दिसली. कुणी देत होते. तर कुणी त्यांना हाडतूड करत होते. पाहून मनाला खूप वाईट वाटले. इतक्या चिमुकल्या वयात काय ही वेळ आली या मुलांवर. खूपच वाईट. ती मुले काही खाऊ मिळाला तर तिथेच खात होती. जर कुणी पैसे दिले तर धावत रस्त्याच्या पलीकडे जात होती आणि तिथून परत येत होती. ती मुलं तिथं गाडी उभी असल्यामुळे मला ती तिथे जाऊन काय करतात ते समझले नाही. जेव्हा ती गाडी तिथून निघून गेली त्यानंतर मी पाहतोय ते काय, त्यांची आई तिथे बसली होती आणि ते पण एक चिमुकल्याला मांडीवर झोपवत होती. ती मुले त्यांच्या आईकडे जाते होती जे मिळेल ते तिला देत होती आणि परत येत होती... जेवढं मला मघाशी त्या मुलांचे वाईट वाटले होते त्यापेक्षा कितीतरी जास्त राग मला त्या बाईचा आला होता... तळपायाची आग मस्तकाला गेली होती.

तब्ब्ल चार मुले होती त्या बाईला... रहायला घर नाही, झोपायला जागा नाही... ना कामं, ना शिक्षण, ना खायला काय... हे असं असताना सुद्धा त्या बाईला चार मुले होती... काय विचार करून त्या बाईने त्या चार मुलांना जन्म दिला असेल... आणि त्यांना जन्मताच अस रस्त्यावर भीक मागायला सोडलं असेल... आणि ती मात्र एका जागी बसून त्या मुलांनी गोळा केलेल्या भिकेवर ती आपला उदर निर्वाह करत असेल... त्यांचा बाप काही मला तिथे दिसला नाही... मात्र त्याचेही काही फारस वेगळं नसावं... तो पण तसाच आईत खाऊच असणार यात काही शंका नाही...

या सगळ्यात खरं तर त्या लहान मुलांची काय चूक... उद्या मोठी झाली कि ती काही भीक नाहीत मागणार... त्या वेळेस त्यांना मात्र कळायला लागेल आणि त्या गोष्टीची लाज वाटू लागेल पण ती चांगल्या मार्गी नाहीत लागणार... मग् ती चोऱ्या माऱ्या करणार... आणि अशाच मार्गांवर ती चालत राहणार... आणि ती पण उद्या हेच बोलणार कि यात आमची काय चूक... खरंच यात त्यांची काय चूक... आणि ज्यांनी या चुका केल्या आहेत त्यांच काय???? खरं तर या गोष्टीला आळा बसणं फार गरजेचं आहे कारण मी पाहिलेलं हे एकाच दृश्य नाही पुण्यात अनेक सिग्नल वर तुम्हाला हे विदारक रूप पहायला मिळेल... हीच गोष्ट आणि असेच प्रकार... कदाचित या पेक्षा भीषण... कारण मी एकदा कात्रजच्या सिग्नलला सहा मुले पाहिली होती...

# सभागृहातील भाषणांचा धमाकेदार कार्यक्रम...

**विधानसभेला नवे अध्यक्ष मिळाले. राहुल नार्वेकर हे सर्वांत तरुण विधानसभा अध्यक्ष १६४ मते मिळवून विजयी झाले.**

नार्वेकर यांनी आजवर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप असा प्रवास केल्यामुळे सभागृहात त्यांचे बरेच मित्र आहेत आणि सभागृह चालविणे त्यांना सोपे जाऊ शकते. ही निवडणूक खेळीमेळीत पार पडली. भाजप, शिंदे-सेना आणि अपक्ष यांच्याकडे स्पष्ट बहुमत असल्याचे आता सिद्ध झाले आहे. त्यामुळे, आज-सोमवारी मांडला जाणारा विश्वासदर्शक ठराव ही औपचारिकता ठरली आहे. कोणताही नवा कलह न होता हा ठरावही शांततेत पार पडावा. अध्यक्षांच्या निवडीनंतर बोलताना अनेक सदस्यांनी सीमा ओलांडून टोलेबाजी केली. त्यात अजित पवार प्रमुख होते. स्वत: मुख्यमंत्र्यांनी भाषण अभिनंदनापुरते मर्यादित ठेवले नाही. आज सभागृहात भाषणांचा जो धमाका होणार आहे, त्याची ही चुणूक होती. छगन भुजबळांनी मध्येच सोशल मिडियावरचा विनोद वाचून दाखविणे, हा तर औचित्यभंगच होता. आदित्य ठाकरे यांनी 'आपले जुने मित्र' राहुल



नार्वेकर यांचे अभिनंदन करताना 'डोळ्यांत डोळे घालून' सत्ताधारी पाहात नसल्याचे म्हटले आणि नंतर शिवसेनेतील फुटिरांची नैतिक परीक्षा झाली; असाही शेरा मारला. याचा अर्थ, शिवसेनेने विधानसभेत शिंदे सरकार बहुमतात आहे, ही 'दगडावरची रेघ' मान्य केली आहे. नैतिकतेची भाषा संदिग्ध व सापेक्ष असते. तिने वस्तुस्थितीत फरक पडत नाही. मात्र, शिवसेनेच्या दोन्ही गटांच्या प्रतोदांनी व्हिप म्हणजे पक्षादेश काढले होते. मतदानाचे आकडे पाहता हे दोन्ही पक्षादेश अनेक सदस्यांनी धुडकावले. आता ही लढाई तीन पातळीवर लढली जाईल. पहिली लढाई, विधानसभा अध्यक्षांच्या अखत्यारीत. नार्वेकर हे कायदेतज्ज्ञ असल्याचे कौतुक रविवारी झाले. तेव्हा त्यांना हा पक्षादेशाचा आणि त्या अनुषंगाने येणारा शिवसेनेतील फुटीचा मुद्दा हाताळावा लागेल. सभागृहातील बलाबल पाहता, अध्यक्षांच्या कौलाचा अंदाज येऊ शकतो. ही दुसरी लढाई न्यायालयात जाईल. तिची सुरूवातही झाली आहे. तिसरी लढाई, निवडणूक आयोगाच्या व्यासपीठावर होईल. तेथे शिवसेना या पक्षाचे निवडणूक चिन्ह आणि पक्षाच्या घटनेला अनुसरून इतर काही मुद्दे येतील. ही सारी लढाई दीर्घ काळ चालू शकते. त्याचवेळी, राज्यातला व विशेषत: महामुंबईतील मैदानातला शिवसैनिक काय ठरवतो, यावरही दोन्ही गटांचे पुढचे राजकारण अवलंबून आहे. या साऱ्या प्रक्रियेतला पहिला टप्पा विधानसभा अध्यक्षांच्या निवडीने ओलांडला गेला. तो टप्पा एकनाथ शिंदे यांच्या गटाने जिंकला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी ।  
पूर्वकर्मा होळी करुनी सांडूं ॥१॥  
अमुप हे गांठीं बांधूं भांडवल ।  
अनाथा विठ्ठल आम्हां जोगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील दोन वाहनांचा अपघात

। मुंबई । महाईन्यूज ।



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यातील दोन वाहनांना अपघात झाल्याचं बातमी समोर आली आहे. मुंबई महापालिकेजवळ हा किरकोळ अपघात झाला यामध्ये कोणीही जखमी झालेलं नाही. चालकाचे नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वातंत्रवीर सावरकर स्मारकाला भेट दिल्यानंतर ते पावसाच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन कक्षाला भेट देण्यासाठी रवाना झाले. यावेळी पालिकेच्या मुख्यालयाजवळ येताना त्यांच्या ताफ्यातील दोन गाड्यांचा अपघात झाला. ताफ्यातील एका कारने पुढच्या कारला मागून जोरदार धडक दिली. पुढच्या कार चालकाने आपत्कालीन ब्रेक दाबल्याने हा प्रकार घडला. पुढची कार अचानक थांबल्याने मागच्या कार चालकाचं नियंत्रण सुटल्याने ती पुढच्या कारवर आदळली. परंतू या अपघातात कोणीही जखमी झालेलं नाही, अशी माहिती देखील मिळाली आहे.

## नव्या सरकारची पहिली भेट, मूल्यवर्धित करकपातीची घोषणा

# खुशखबर! इंधन स्वस्ताई लवकरच!

### राज्य सरकारांनीही मूल्यवर्धित करात कपात करण्याची अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची सूचना

। मुंबई । महाईन्यूज ।

भाजपशासित राज्यांनी केलेल्या करकपातीच्या धर्तीवर राज्यातही पेट्रोल आणि डिझेलवरील मूल्यवर्धित करात कपात करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी विधानसभेत केली. हा कर किती कमी करणार, याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतरच इंधन प्रत्यक्षात स्वस्त होईल.

वाढती महागाई रोखण्यासाठी केंद्र सरकारने मे महिन्यात पेट्रोलवरील अबकारी करात आठ रुपये, तर डिझेलवरील करात सहा रुपये कपात केली होती. त्यावेळी राज्य सरकारांनीही मूल्यवर्धित करात कपात करावी, अशी सूचना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली होती. त्यानुसार भाजपशासित राज्यांनी करात कपात केली होती. मात्र, बिगर-भाजपशासित राज्यांनी कपात करण्याचे टाळले होते. त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिगर-भाजपशासित राज्यांना कानपिचक्या देत कर कमी करण्याचे आवाहन केले होते.



पंतप्रधानांच्या आवाहनानुसार, राज्यातील महाविकास आघाडी सरकारनेही पेट्रोलवरील मूल्यवर्धित करात २ रुपये ०८ पैसे, तर डिझेलवरील करात १ रुपया ४४ पैसे कपात केल्याचा दावा केला होता. मात्र, सरकारने कोणतीही इंधन दरकपात न करता केंद्राच्या निर्णयाचाच लोकांना लाभ दिल्याचा आरोप भाजपने केला होता.

राज्यात सत्तांतर होताच इंधन करकपात करण्याची घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी विधानसभेत विश्वासदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर केली भाजपशासित राज्यांप्रमाणे राज्यातही इंधनावरील कर कमी करण्याची भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. विश्वासदर्शक ठराव जिंकल्यानंतर नव्या सरकारची भूमिका स्पष्ट करताना शिंदे यांनी तीन निर्णय जाहीर करीत शेतकरी आणि जनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला. महाविकास आघाडी सरकारने इंधनावरील मूल्यवर्धित करात कपात न करताच इंधन दरकपात केल्याचे सांगत जनतेची फसवणूक केली. मात्र, आपले सरकार लवकरच इंधनावरील मूल्यवर्धित करात कपात करणार असून, त्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाईल, असे जाहीर केले. तसेच रायगडच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणी गावाच्या सर्वांगिण विकासासाठी २१ कोटींचा निधी देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. राज्याच्या विकासातील शेतकऱ्यांचे योगदान सर्वाधिक असून, त्यांना भरभरून मदत देण्याची सरकारची भूमिका आहे. त्यातून लवकरच शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा आमचा निर्धार असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

### 'फडणवीस हे मोठे कलाकार'

"राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेचे दोन्ही उमेदवार निवडून यायला हवे होते. त्यासाठी मी बाहेरून तीन मतांची व्यवस्था केली होती. तरीही पराभव झाला. कारण, देवेंद्र फडणवीस मोठे कलाकार निघाले. त्यांनी आमच्याबरोबरच्या छोट्या पक्षांची-अपक्षांचीच मते भाजप उमेदवाराकडे वळवली", असे सांगत एकनाथ शिंदे यांनी सत्तांतराचे नाट्य विधानसभेत उलगडले "सत्तांतरामागे फडणवीस यांची कलाकारी आहे त्यांनीच सारे काही घडवून आणले आम्ही दोघे कधी भेटायचो, हे आमच्या लोकांनाही कळायचे नाही", असे शिंदे म्हणाले

### विश्वासदर्शक ठराव जिंकला

एकनाथ शिंदे सरकारवरील विश्वासदर्शक ठराव १६४ विरुद्ध ९९ मतांनी विधानसभेत मंजूर झाला. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह काँग्रेसचे नऊ आमदार अनुपस्थित राहिल्यामुळे वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जाऊ लागले. मात्र, वाहतूक कोंडीत अडकल्याने वेळेत पोहोचू शकलो नाही, असे अशोक चव्हाण यांनी स्पष्ट केले.

---

# "मी सांगोल्याचा माजलेला रेडा, खाली शिंगाट घातलं तर असाच उभा करेन!

## जाहीर सभेतून शहाजीबापू पाटलांकडून संजय राऊतांना थेट धमकीवजा इशारा

। सांगोला । महाईन्यूज ।

सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी जाहीर सभेतून शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊतांवर जोरदार टीका केली आहे. शहाजीबापू यांनी "मी सांगोल्याचा माजलेला रेडा असून खाली शिंगाट घातलं तर तुला असाच उभा करेन, आमच्या नादाला लागू नको" अशा शब्दांत धमकीवजा इशारा दिला आहे. तसेच त्यांनी संजय राऊतांचा उल्लेख 'शिवसेनेचा नारद मुनी' असा केला आहे.

बंडखोरी केल्यानंतर अखेर १५ दिवसांनी शहाजीबापू पाटील हे आपल्या मतदारसंघात परतले. सांगोल्यात गेल्यानंतर त्यांनी जाहीर सभेतून संजय राऊतांवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी आपल्या भाषणात म्हटलं की, "संजय राऊत... मी सांगोल्याचा माजलेला रेडा आहे, एक शिंगाट खाली घातलं तर तुला असाच उभा करेन, आमच्या नादाला लागू नको." यावेळी त्यांनी भरसभेत संजय राऊतांची नक्कल देखील केली आहे.



त्यांनी नक्कल करताना म्हटलं की, "संजय राऊतांचं मनगट हे अंगठ्याएवढं आहे, आणि ते कापून काढू, प्रेतं आणू अशा धमक्या देतात. तुझं तुलाच चालता येईना, सकाळी बशीभर पोहे खातो, सायंकाळी चपाती खाऊन झोपते. ये आमच्याकडे बोकड कसं वरपायचं, कोंबडी कशी तोडायची असते, शिकवतो. त्यानंतर अंगात रग येते. मनगटात ताकद येते. ज्यांच्या मनगटात ताकद असते, त्यांनीच बोलावं. उद्धव ठाकरेंमुळे संधी मिळाली आहे, म्हणून संजय राऊतांनी याचा गैरफायदा घेऊ नये. त्यांनी तातडीनं बोलणं बंद करावं, तरच उरलं-सुरलं ठाकरे घराणं राहीन, नाहीतर ठाकरे घराण्याला संपवण्याची सुपारी संजय राऊतांनी उचलली आहे," असंही शहाजी बापू पाटील म्हणाले.

तत्पूर्वी, शहाजी बापू पाटलांनी सांगोल्यात दाखल झाल्यानंतर, माध्यमांशी संवाद साधला होता. तेव्हा ते म्हणाले, की राऊतांच्या नादी लागण्यात काय अर्थ आहे. सांगोल्यातील मैदानातून त्यांच्याबाबत बोलणार, त्याप्रमाणे शहाजीबापू पाटलांनी सांगोल्यातील जाहीर सभेतून संजय राऊतांवर जोरदार टीका केली आहे.

### ज्यांच्या मनगटात ताकद असते, त्यांनीच बोलावं

बंडखोरी केल्यानंतर अखेर १५ दिवसांनी शहाजीबापू पाटील हे आपल्या मतदारसंघात परतले. सांगोल्यात गेल्यानंतर त्यांनी जाहीर सभेतून संजय राऊतांवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी आपल्या भाषणात म्हटलं की, "संजय राऊत... मी सांगोल्याचा माजलेला रेडा आहे, एक शिंगाट खाली घातलं तर तुला असाच उभा करेन, आमच्या नादाला लागू नको." यावेळी त्यांनी भरसभेत संजय राऊतांची नक्कल देखील केली आहे. त्यांनी नक्कल करताना म्हटलं की, "संजय राऊतांचं मनगट हे अंगठ्याएवढं आहे, आणि ते कापून काढू, प्रेतं आणू अशा धमक्या देतात. तुझं तुलाच चालता येईना, सकाळी बशीभर पोहे खातो, सायंकाळी चपाती खाऊन झोपते. ये आमच्याकडे बोकड कसं वरपायचं, कोंबडी कशी तोडायची असते, शिकवतो. त्यानंतर अंगात रग येते. मनगटात ताकद येते. ज्यांच्या मनगटात ताकद असते, त्यांनीच बोलावं. उद्धव ठाकरेंमुळे संधी मिळाली आहे, म्हणून संजय राऊतांनी याचा गैरफायदा घेऊ नये.

## शॉर्ट न्यूज »

### युद्धनौका, पाणबुड्यांपासून इतर विभागांमध्येही महिला अग्निवीरांची होणार भरती



।मुंबई । महाईन्यूज

भारतीय नौदलात अग्निवीरांच्या भरतीच्या पहिल्या तुकडीत 20 टक्के जागांवर महिला अग्निवीरांची भरती केली जाणार आहे. एवढेच नाही तर या भरती होणाऱ्या महिला अग्निवीरांना नौदल युद्धनौका, पाणबुड्यांपासून ते इतर अनेक विभागांमध्येही तैनात करणार आहे. वायुसेना आणि लष्करानंतर आता नौदलातही मोठ्या संख्येने युवक अग्निवीर योजनेच्या माध्यमातून भरतीसाठी नोंदणी करत आहेत. ज्यात महिला उमेदवारांचाही समावेश आहे. यात आत्तापर्यंत 10 हजारांहून अधिक महिलांनी भरतीसाठी अर्ज केले आहेत. नौदलाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, अग्निवीर भरतीसाठी नोंदणीचा वेळ अपेक्षेनुसार आहे. यात महिला उमेदवार देखील स्वारस्य दाखवत आहेत.

### भाजपच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांचे वादग्रस्त वक्तव्य प्रकरण

# 'नुपूर शर्मांचे शिरच्छेद करणाऱ्याला माझं घर देणार'!

## अजमेर दर्गाच्या खादिमांचं खळबळजनक विधान

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

भाजपच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्यावर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर जगभरातून त्यांचा विरोध करण्यात येत आहे. भारततही मोठ्या प्रमाणत गदारोळ निर्माण झाला असून अजूनही या घटना थांबताना दिसत नाहीयेत. राजस्थानमधील अजमेर दर्गाच्या एका खादीमांनी 'नुपूर शर्मांचे शिरच्छेद करणाऱ्या व्यक्तीला मी माझं घर देणार', असं खळबळजनक विधान केलं आहे. भाजपच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्यावर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर जगभरातून त्यांचा विरोध करण्यात येत आहे. भारततही मोठ्या प्रमाणत गदारोळ निर्माण झाला असून अजूनही या घटना थांबताना



दिसत नाहीयेत. राजस्थानमधील अजमेर दर्गाच्या एका खादीमांनी 'नुपूर शर्मांचे शिरच्छेद करणाऱ्या व्यक्तीला मी माझं घर देणार', असं खळबळजनक विधान केलं आहे. दर्ग्याचे खादिम सलमान चिश्ती यांनी हा व्हिडिओ शूट करून व्हायरल केला आहे. या प्रकरणी अजमेर शहरातील अलवर गेट पोलीस ठाण्यात सलमान चिश्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खादीम सलमान चिश्ती यांनी दारूच्या नशेत हा व्हिडिओ बनवला असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. सुमारे दोन मिनिटे ५० सेकंदाच्या या व्हिडिओमध्ये सलमान चिश्तींनी नुपूर शर्मांना उघडपणे जीवे मारण्याची धमकी दिली आहे. या धमकीनंतर सलमान चिश्ती फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

### परिसरात तणावाचे वातावरण

व्हिडिओमध्ये खादिम सलमान चिश्तीने नुपूर शर्माला गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी दिली असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच जी व्यक्ती नुपूर शर्माचा शिरच्छेद करेल त्याला मी माझं घर आणि संपत्ती बक्षीस म्हणून देईन, असा दावाही केला आहे. या व्हिडिओनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्या दर्ग्यातून नेहमी शांततेचा, बंधू भावनेचा संदेश दिला जातो. त्याच दर्ग्याचे खादीम जीवे मारण्याची धमकी देत असतील तर त्याचा समाजावर काय परिणाम होणार, अशी चर्चा सुरु आहे.

भाजपच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्यावर केलेल्या वादग्रस्त वक्तव्यानंतर जगभरातून त्यांचा विरोध करण्यात येत आहे. भारततही मोठ्या प्रमाणत गदारोळ निर्माण झाला असून अजूनही या घटना थांबताना दिसत नाहीयेत. राजस्थानमधील अजमेर दर्गाच्या एका खादीमांनी 'नुपूर शर्मांचे शिरच्छेद करणाऱ्या व्यक्तीला मी माझं घर देणार', असं खळबळजनक विधान केलं आहे.

# स्वातंत्र्यदिनाच्या परेडवर इमारतीच्या छतावरुन बेधुंद गोळीबार

## सहा जणांचा मृत्यू, 30 जखमी; 22 वर्षीय तरुणाला अटक

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अमेरिकेतील शिकागोमध्ये स्वातंत्र्यदिनाच्या परेडवर गोळीबार करणाऱ्या तरुणाला पोलिसांनी अटक केली आहे. सोमवारी इमारतीच्या छतावरुन रायफलने करण्यात आलेल्या गोळीबारात सहा जणांचा मृत्यू तर ३० जण जखमी झाले होते. यानंतर पोलिसांनी कारवाई करत २२ वर्षीय रॉबर्ट क्रिमो याला अटक केली आहे. रॉबर्ट त्यावेळी परिसरातच होता असं पोलिसांनी सांगितलं आहे.

पोलिसांनी कारला घेरलं असून यावेळी रॉबर्ट हात वर करत बाहेर येताना दिसत आहे. यानंतर तो खाली जमिनीवर बसतानाही दिसत आहे. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केलं जाईल असं हायलँड पार्क पोलिसांनी सांगितलं आहे.



### अमेरिकेत बंदूक हिंसाचारप्रतिबंधक विधेयक मंजूर

अमेरिकेतील बहुप्रतीक्षित बंदूक हिंसाचार प्रतिबंधक विधेयकावर अध्यक्ष जो बायडेन यांनी २६ जूनला स्वाक्षरी केली. अमेरिकेत बेछुट गोळीबाराच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागल्याने प्रतिबंधासाठी वैधानिक तरतूद करण्याच्या मागणीचा दबाव सरकारवर वाढला होता. "यामुळे निष्पाप जीव वाचतील," असे उद्गार बायडेन यांनी काढले होते. बायडेन यांनी सांगितलं होतं, की या दुर्घटनांमुळे ठोस कृती करण्याची गरज होती. तशी व्यापक मागणीही होत होती. आज आम्ही त्या दिशेने पाऊल टाकले आहे.

पोलिसांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, सहा लोकांचा मृत्यू झाला असून २४ जण रुग्णालयात दाखल आहेत. घटनास्थळावरुन रायफल जप्त करण्यात आली आहे. अमेरिकेत बंदुकीचा वापर करत होणाऱ्या गोळीबाराच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली होती.

२४ मे रोजी टेक्सासमध्ये झालेल्या गोळीबारात १९ विद्यार्थी आणि २ शिक्षकांना आपला जीव गमवावा लागला होता. तर न्यूयॉर्कमध्ये १४ मे रोजी किराणा दुकानात झालेल्या हल्ल्यात १० जणांचा मृत्यू झाला होता. आपल्या मुलीसोबत परेडमध्ये सहभागी झालेल्या गार्सिया यांनी एबीसीसोबत बोलताना सांगितलं की, आपण अचानक गोळीबार ऐकला आणि थांबलो. काही वेळाने हा गोळीबार अजून वाढला. साक्षीदारांच्या माहितीनुसार, हल्लखोर एका छतावर होता आणि तेथून गर्दीवर गोळीबार केला.

# ओला ड्रायव्हरकडून सॉफ्टवेअर इंजिनिअरची हत्या

। चेन्नई। वृत्तसंस्था ।

चुकीचा ओटीपी सांगितल्यानं ओला चालकाने ओला चालकाने एका सॉफ्टवेअर इंजिनिअरची हत्या केल्याचा धक्कादाय प्रकार चेन्नईत उघडकीस आला आहे. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. उम्रेंद्र असं या हत्या झालेल्या सॉफ्टवेअर इंजिनिअरचं नाव आहे.

उम्रेंद्र हे कोईम्बतूर येथे एका सॉफ्टवेअर कंपनीत काम करतात. चेन्नईत ते आपल्या पत्नी आणि मुलांसह नातेवाईकाकडे आले होते. रविवारी रात्री ते आपल्या पत्नी आणि मुलांसह चित्रपट बघायसाठी एका मॉलमध्ये गेले होते. तेथून परतताना त्यांच्या पत्नीने



ओला कॅब बुक केली. मात्र, चुकीचा ओटीपी तेही उशीरा सांगितल्याने ओला ड्रायव्हर आणि उम्रेंद्र यांच्यात वाद झाला.तपास अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाद विकोपाला गेल्यानंतर ओला ड्रायव्हरने उम्रेंद्र यांना गाडीतून उतरवण्यास सांगितले. तसेच त्यांच्या दिशेने फोन फेकला. या रागात उम्रेंद्र यांनी गाडीतून उतरत दरवाज जोरदार ढकलला. त्यानंतर दोघांमध्येही हाणामारी सुरू झाली. यात जब्बर मारहाण झाल्याने उम्रेंद्र बेहोश झाले होते.

# कॉफी विथ करण’च्या शोमध्ये लग्नाच्या पहिल्या रात्रीबाबत भलतंच बोलून गेली आलिया भट्ट



सुप्रसिद्ध दिग्दर्शक करण जौहर सध्या त्याच्या ‘कॉफी विथ करण’ शोमुळे चर्चेत आहे. या लोकप्रिय शोमध्ये अनेक दिग्गज मंडळी हजेरी लावताना दिसतात. इतकंच नव्हे तर कलाकार मंडळींना या शोमध्ये खासगी आयुष्याबाबत प्रश्न विचारले जातात. ‘कॉफी विथ करण’चा हा ७वा सीझन आहे. या नव्या सीझनमध्ये अनेक कलाकार मंडळी हजेरी लावतना दिसणार आहेत. त्यामध्ये अभिनेत्री आलिया भट्टचा देखील समावेश आहे. कॉफी विथ करण’चा एक प्रोमो करणने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटद्वारे शेअर केला आहे. यामध्ये रणवीर सिंग आणि आलिया भट्ट दिसत आहे. करण त्यांना त्यांच्या वैवाहिक आयुष्याबाबत प्रश्न विचारताना दिसतोय. पण गंमत अशी की लग्नानंतरची पहिली रात्र कशी असते? याबाबत आलिया भलतंच बोलून गेली. त्यामुळे हा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होताना दिसत आहे. आलियाला करण लग्नानंतरच्या आयुष्याबाबत प्रश्न विचारतो. त्यावेळी ती बोलते, “लग्नाची पहिली रात्र वगैरे असं काही नसतं. कारण त्याक्षणी आपण खूप दमलेलो असतो.” आलियाचं हे उत्तर ऐकून रणवीर सिंग आणि करण जौहर दोघंही पोट धरुन हसू लागतात. आलिया नेमकं हे काय बोलून गेली? हे त्यांना देखील काही क्षणांसाठी कळत नाही. पण हा नवा प्रोमो पाहून रणवीर-आलियाचा एपिसोड गाजणार असंच दिसतंय.

७ जुलै पासून ‘कॉफ विथ करण’ डिस्नी प्लस हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर पाहता येणार आहे. कतरिना कैफ-विक्की कौशल देखील या शोमध्ये हजेरी लावणार आहेत. त्याचबरोबरीने बॉलिवूडचे तीन खान शाहरुख, सलमान आणि आमिर या शोसाठी एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. पण अद्याप या शोची गेस्ट लिस्ट समोर आलेली नाही.

# “नीट वाग आता माझं लग्न झालंय...” भर कार्यक्रमात ओरडली दीपिका पदुकोण

दीपिका पदुकोण तिचा पती रणवीर सिंग आणि कुटुंबियांसोबत कॅलिफोर्नियातील एका कोंकणी संमेलनात सहभागी झाली होती. बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण सोशल मीडियावर नेहमीच काही ना काही कारणाने चर्चेत असते. दीपिका पदुकोणला ब्यूटी विथ ब्रेन असंही म्हटलं जातं. अनेक मुलाखतींमध्ये दीपिका अतिशय हुशारीने प्रश्नांची उत्तरं देताना दिसली आहे. आताही दीपिकाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. ज्यात तिनं आपल्या उत्तरानं भर कार्यक्रमात एका चाहत्याला गप्प केलं. दीपिकाचा हा व्हिडीओ सध्या बराच चर्चेत आहे.



दीपिका पदुकोण तिचा पती रणवीर सिंग आणि कुटुंबियांसोबत कॅलिफोर्नियातील एका कोंकणी संमेलनात सहभागी झाली होती. या कार्यक्रमात दीपिकाच्या देसी अंदाजानं सर्वांचीच मनं जिंकली. तिच्या या लुकवर चाहते देखील फिदा झाले. दीपिकाचा याच कार्यक्रमातील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे. या कार्यक्रमात एक चाहता दीपिकाला पाहून ‘वी लव्ह यू’ असं ओरडताना दिसत आहे. यावर दीपिकानंही त्याला

# लग्नानंतर पळून जावसं वाटत होतं” फराह खानचा खुलासा

बॉलिवूड कोरिओग्राफर फराह खानने आजवर अनेक बड्या सिनेमांसाठी कोरिओग्राफी केलीय. सोबतच फराहने दिग्दर्शक म्हणूनही बॉलिवूडमध्ये ओळख निर्माण केलीय. फराहने रियॅलिटी शोमध्ये जजची भूमिका पार पाडत अनेकांना प्रोत्साहन दिलंय. दिलखुलास अंदाजासाठी फराह ओळखली जाते.

नुकतात फराहने तिच्या वैवाहिक आयुष्यातील सुरुवातीच्या काळाबद्दल खुलासा केलाय. मिका सिंगच्या ‘स्वयंवर: मिका दी वोहती’ या शोमध्ये फराहने नुकतीच हजेरी लावली होती. या शोमध्ये फराहने लग्नानंतर ती घर सोडून पळून जाणार होती असा खुलासा केला. ‘स्वयंवर: मिका दी वोहती’ या शोमध्ये फराहने मोठी धमाल केली. यावेळी तिने लग्नानंतरचा अनुभव शेअर केला. २००४ सालामध्ये फराहने फिल्म एडिटर शिरिष कुंदरसोबत विवाह केला. मिकाच्या शोमध्ये फराहने स्पर्धकांच्या प्रश्नांची उत्तर दिली. यावेळी फराहने लग्नानंतर तिला पळून जावसं वाटत होतं असा खुलासा केला. मिकाबद्दल बोलताना फराह म्हणाली, “मिका खूप संवेदनशील व्यक्ती आहे. एखादी जबाबदार मुलगीच त्याला सांभाळू शकते. मला वाटतं लग्नासाठी वय ठरलेलं नाही. तुम्हाला योग्य व्यक्ती मिळेल तेव्हाच तुम्ही लग्न करा. मी तर माझ्या लग्नानंतर पहिल्याच वर्षी पळून जायचा विचार करत होते. कारण त्यावेळी सर्व काही सांभाळणं खूप कठीण झालं होतं.”




# रश्मिका मंदानाला पहिल्या चित्रपटासाठी मिळाले होते इतके मानधन

दक्षिणात्य अभिनेत्री आणि नॅशनल क्रश अभिनेत्री रश्मिका मंदाना ही नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असते. रश्मिका ही गेल्या काही दिवसांपासून पुष्पा या तिच्या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटानंतर ती दक्षिणेतील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक म्हणून ओळखली जाते. रश्मिका मंदाना ही लवकरच बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. मिशन मजनू या चित्रपटाद्वारे रश्मिका ही बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. पण नॅशनल क्रश म्हणून ओळखली जाणाऱ्या रश्मिकाने नुकतंच तिच्या पहिल्या पगाराबद्दल भाष्य केले आहे.

रश्मिका मंदानाने नुकतंच ‘दैनिक भास्कर’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक खुलासे केले. यात ती म्हणाली की, “मला कधीही अभिनेत्री व्हायचे नव्हते. मला माझ्या वडिलांचा व्यवसाय सांभाळायचा होता. पण त्यावेळी माझ्याकडे इतका आत्मविश्वास नव्हता की मी लोकांच्या नजरेला नजर देत त्यांच्याशी बोलू शकते. त्यामुळेच मी शिक्षण पूर्ण करून वडिलांच्या व्यवसायात हातभार लावणार याचा विचार केला होता.”






# ‘पुण्यश्लोक अहिल्याबाई’ मालिकेत द्वारकाबाईंची भूमिका साकारणार

सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवरील ‘पुण्यश्लोक अहिल्याबाई’ या भव्य ऐतिहासिक मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या मालिकेत राणी अहिल्याबाई होळकर यांचे जीवनचरित्र उलगडून दाखविले आहे आणि आपल्या सुजाण कारभाराने त्यांनी आपल्या राज्यात शांती आणि समृद्धी कशी प्रस्थापित केली. माणूस जन्माने नाही तर कर्तृत्वाने कसा मोठा असतो हे दाखवले आहे. आपले सासरे मल्हारराव होळकर यांच्या भक्कम पाठिंब्याने अहिल्याबाईंनी समाजातील अनिष्ट रूढींना आव्हान दिले आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी असामान्य योगदान दिले. त्यांनी केवळ इतिहास घडवला नाही, तर अनेक भावी पिढ्यांसाठी त्या प्रेरणामूर्ती बनल्या. एतशा संझगिरी, राजेश शृंगारपुरे आणि गौरव अमलानी अभिनीत ही मालिका ८ वर्षांची झेप घेणार आहे. संस्कारांचे सिंचन करणाऱ्या मातेपासून ते जीवनदात्री मातोश्री बनण्यापर्यंतचा हा प्रवास असेल. या मालिकेत लीपनंतर द्वारकाबाईची भूमिका प्रसिद्ध अभिनेत्री रेशम टिपणीस साकारणार आहे. मल्हारराव होळकरांची दुसरी पत्नी असल्याने द्वारकाबाईला नेहमीच असुरक्षित वाटत असे. खंडेराव तिला आवडत असला तरी मल्हाररावांच्या पश्चात तो राजा व्हावा हे तिला पटत नव्हते. पण अहिल्या त्यांच्या जीवनात आल्यानंतर तिची असुरक्षितता आणखीनच वाढली आणि तिच्या विरोधात ती लोकांच्या मनात विष भरवू लागली. खंडेराव आणि अहिल्येत बेबनाव व्हावा यासाठी तिने खंडेरावाला पार्वतीशी लग्न करण्यास भाग पाडले. लीपनंतर प्रेक्षक बघतील की, द्वारकाबाई अहिल्याबाईच्या जीवनात अडथळे उभे करण्याचे कट चालूच ठेवते का?

## शॉर्ट न्यूज »

### बुमराहबाबत इयान चॅपेलचे मोठे वक्तव्य,

अ‍ॅमस्टेलव्हीन । महाईन्यूज

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाचव्या कसोटी सामन्यापूर्वी नियमित कर्णधार रोहित शर्मा कोविड १९ पॉझिटिव्ह झाला. त्यामुळे जसप्रीत बुमराहकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे प्रदीर्घ काळानंतर एखाद्या गोलंदाजाला भारतीय संघाची धुरा मिळाली. याबाबत ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेटपटू इयान चॅपेल यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. जसप्रीत बुमराहला कर्णधार म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय धाडसी असल्याचे चॅपेल म्हणाले आहेत. याबाबत त्यांनी भारताचे कौतुक केले आहे. नियमित कर्णधार रोहित शर्मा आणि के एल राहुल प्रकृतीच्या कारणामुळे एजबस्टन कसोटी सामन्यात खेळू शकले नाहीत. अशा परिस्थितीमध्ये २८ वर्षीय वेगवान गोलंदाज बुमराहकडे कर्णधारपद दिले गेले. कर्णधार झाल्यानंतर त्याने अधिक प्रभावी कामगिरी केल्याचे दिसत आहे. त्याने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी स्टुअर्ट ब्रॉडच्या एका षटकात ३५ धावा जमा करून विश्वविक्रम रचला. याशिवाय इंग्लंडच्या पहिल्या डावात तीन आणि दुसऱ्या डावात बळी घेतले.

### भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात सुरु असलेल्या कसोटी मालिका

# इंग्लंड विरोधात भारताचा लज्जास्पद पराभव!

।पालेकेले । महाईन्यूज ।

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या कसोटी मालिकेत इंग्लंडने भारतीय संघावर विजय मिळवला आहे. हा सामना इंग्लंडने ७ गडी राखून जिंकला. या विजयासह मालिकेत २-२ अशी बरोबरीही साधली. इंग्लंड संघाच्या मधल्या फळीत खेळणाऱ्या जो रूटने (ROOT) शतकी खेळी केली. रुटने नाबाद १४२ धावा केल्या. तसेच, जॉनी बेअरस्टो यानेही नाबाद ११४ धावा केल्या. दोघांच्या शतकी खेळीच्या जोरावर इंग्लंडने विजय मिळवला. गेल्या वर्षी भारत आणि इंग्लंड दरम्यान पाच कसोटी सामन्यांची मालिका आयोजित करण्यात आली होती. यातील पाचवा सामना कोरोनाच्या संकटकामुळे पुढे ढकलण्यात आला होता. १ जुलैपासून बर्मिंगहॅममधील एजबस्टन क्रिकेट स्टेडियमवरती खेळवला गेला. आज या सामन्याच्या पाचव्या




दिवशी इंग्लंडला विजयासाठी ११९ धावांची तर भारताला ७ विकेट्सची आवश्यकता होती. भारताकडे ३७७ धावांची आघाडी

या कसोटी मालिकेच्या दुसऱ्या डावात भारताने चेतेश्वर पुजारा (६६) आणि ऋषभ पंत (५७) यांच्या अर्धशतकांच्या बळावर सर्वबाद २४५ धावा केल्या होत्या.

त्यामुळे भारताकडे ३७७ धावांची आघाडी आली होती. मात्र, इंग्लंडच्या फलंदाजांनी आपल्या दुसऱ्या डावात चांगली कामगिरी करत विजय मिळवला. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पहिला कसोटी सामना नॉटिंगहॅममधील ट्रेंट ब्रीज मैदानावर झाला होता. हा सामना अनिर्णित राहिला होता.

लंडनमधील लॉर्ड्स क्रिकेट स्टेडियमवर झालेला दुसरा सामना भारताना १५१ धावांनी जिंकला होता.

मालिकेतील तिसरा सामना लीड्मधील हेडिंग्ले क्रिकेट मैदानावर झाला होता. यजमान इंग्लंडने हा सामना एक डाव आणि ७६ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला होता. परंतु, केनिंग्टन ओव्हल येथे झालेल्या चौथ्या सामन्यात भारताने जोरदार मुसंडी मारत मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली होती. १५७ धावांनी भारताने हा सामना जिंकला होता.



# सानिया मिर्झाची मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक

### भारताच्या आशा पल्लवित

। लंडन । महाईन्यूज ।

टेनिस जगतामध्ये सध्या विम्बल्डनचा थरार सुरू आहे. चार प्रतिष्ठित ग्रँडस्लॅम स्पर्धांपैकी एक असलेल्या या स्पर्धेत भारताची तारांकित खेळाडू सानिया मिर्झा धडाकेबाज कामगिरी करत आहे. तिने क्रोएशियन साथीदार मेट पेव्हिकसह विम्बल्डनमधील मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात तिने गॅब्रिएला डुब्रोव्स्की आणि जॉन पीअर्स या जोडीचा ६-४, ३-६, ७-५ असा पराभव केला. सानिया आणि पेव्हिक या सहाव्या मानांकित जोडीने चौथ्या मानांकित गॅब्रिएला डुब्रोव्स्की-जॉन पियर्स यांचा एक तास ४१ मिनिटे रंगलेल्या लढतीत पराभव केला. आता उर्वरित दोन सामने जिंकून सानियाला तिचे शेवटचे विम्बल्डन संस्मरणीय बनवायचे आहे. तिने प्रथमच विम्बल्डन ओपनच्या मिश्र दुहेरी प्रकारात उपांत्य फेरी गाठली. सानिया मिर्झाची ही शेवटची विम्बल्डन स्पर्धा आहे. या मोसमानंतर टेनिसमधून निवृत्ती घेणार असल्याचे तिने आधीच जाहीर केले आहे. उपांत्य फेरीत सानिया आणि पेव्हिकची जोडी दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीतील विजेत्याशी भिडणार आहे. उपांत्यपूर्व फेरीतील दुसरा सामना डेजारे-नील स्कुप्स्की या द्वितीय मानांकित जोडी आणि सातव्या मानांकित जेलेना ओस्टापेन्को-रॉबर्ट फराह यांच्यात आहे. सानियाने महिला दुहेरी गटातही भाग घेतला होता. परंतु, ती आणि तिची चेक जोडीदार लुसी ह्राडेका पहिल्याच सामन्यात बाहेर गेल्या होत्या.

### महिला विश्वचषक हॉकी स्पर्धा :

# भारतीय संघाची चीनशी बरोबरी



। लंडन । महाईन्यूज ।

भारतीय संघाला मंगळवारी महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेतील चीनविरुद्धच्या सामन्यात १-१ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले. सलामीच्या लढतीतही भारताची इंग्लंडशी बरोबरी झाली होती.

ब-गटातील चीनविरुद्धच्या सामन्यात भारताने पहिल्या दोन सत्रांत अधिक वेळ चेंडूवर ताबा ठेवताना गोलच्या संधीही निर्माण केल्या. मात्र, भारतीय आघाडीपटू गोल करण्यात अपयशी ठरल्या. दुसरीकडे चीनने प्रतिहल्ल्यांवर भर दिला आणि याचा फायदा त्यांना २५व्या मिनिटाला मिळाला. जियाली झेंगने गोल करत चीनला १-० अशी आघाडी मिळवून दिली. मग तिसरे सत्र संपण्यासाठी काही सेकंद शिल्लक असताना वंदना कटारियाने भारताला १-१ अशी बरोबरी साधून दिली.

### डी. वाय. पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची चमकदार कामगिरी

# राष्ट्रीय रोलबॉल स्पर्धेसाठी कुणाल साखरेची जोरदार तयारी !

### उत्तर प्रदेशमधील मेरठमध्ये होणार स्पर्धा

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील कला वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी कुणाल मार्तंड साखरे याची अखिल भारतीय अंतर विद्यापीठ रोलबॉल या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी कुणाल याने जोरदार तयारी केली आहे. उत्तर प्रदेशातील मेरठ येथे दि. १४ ते १६ जुलै दरम्यान आय. आय. एम. टी. विद्यापीठात या स्पर्धा होणार आहेत. या निवडीबद्दल कुणाल साखरे यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजीत पाटील, उपप्राचार्य जयवंत बाबर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

कुणाल हा हिंजवडीतील रहिवाशी असून, हनुमान तालीम मंडळाचे माजी अध्यक्ष मार्तंड साखरे यांचा मुलगा आहे. तसेच, माजी सरपंच मल्हारी साखरे यांचा पुतण्या आणि माजी सरपंच विशाल साखरे यांचा चुलत बंधू आहे. कौटुंबिक राजकीय वारसा असल्यामुळे हिंजवडी ग्रामपंचायतीच्या वतीने त्याच्या निवडीचे स्वागत करण्यात आले. प्रशिक्षक प्रभाकर वाढेराव व संजोग तापकीर यांचे त्यास मोलाचे मार्गदर्शन लाभले.

